# जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे

प्रभाकर हेगडे मार्ग, कोर्ट नाका, ठाणे प. ४००६०१

फोन नं ०२२ – २५४७४५७४/२५४७९७२८

ई–मेल – mahthadc@mhstate.nic.in


**जिल्हा न्यायालय, ठाणे/ई–निविदा/०३/२०२४** **दि. ०६/११/२०२४**

---

जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे व त्यांचे अधिपत्याखालील ठाणे जिल्हयातील सर्व न्यायीक तालुका न्यायालये व कार्यालयीन सर्व इमारतीच्या अंतर्गत व बाहय परिसराची साफसफाई व स्वच्छतागृहांची साफसफाईचे कामाच्या करारासाठी शासनमान्य निविदाधारकांकडून ई–निविदा मागविण्यात येत आहे.

## विभाग :– 01

| | | |
|---|---|---|
| १) निविदा स्वरुप : | | जिल्हयातील सर्व न्यायालयीन इमारतीची साफसफाई करणे, फरशी पुसून स्वच्छ करणे, सर्व व्हरांडे/ कॉरीडोर व जिना इ. ची साफसफाई करणे. व्हरांडयातील लोखंडी जाळया, खिडक्यांच्या काचा/तावदाने, इमारतीचे स्तंभ व लगतच्या भिंती इ. ची साफसफाई करणे, इमारती बाहेरील सर्व परिसर व रस्ते झाडुन स्वच्छ करणे. तसेच सर्व न्यायालयीन इमारतींमधील व परिसरातील सर्व प्रसाधनगृहे व वॉश बेसीन धुणे व स्वच्छता करणे. |
| २) निविदा फॉर्म फी : | | रु. १५,०००/– ना परतावा (अक्षरी पंधरा हजार रु.) |
| ३) अंदाजित रक्कम : | अ. | रु. १२,४४,७३,५९७/– (दोन वर्षाकरीता) (१% लेबर इंन्शुरंस व १८% जी.एस.टी. करासह) जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे व त्यांचे अधिपत्याखालील सर्व न्यायीक तालुका न्यायालये |
| | ब. | रु. ४,३९,९८,६२२/– (दोन वर्षाकरीता) (१% लेबर इंन्शुरंस व १८% जी.एस.टी. करासह) जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे, अंबरनाथ चिखलोली व मिरा–भाईदर येथील नियोजीत नवीन इमारती सुरू झाल्यानंतर |

| | | |
|---|---|---|
| ४) बयाणा रक्कम | : | रु. १०,००,०००/— (अक्षरी दहा लाख रु.)<br>(शासकीय नियमानूसार सूट असल्यास वगळून) शिथील. |
| ५) कामाचा कालावधी | : | ०२ वर्षे |
| ६) सुरक्षाठेव रक्कम | : | निविदा रकमेच्या ०३ टक्के |
| ७) ई—निविदा विक्री व सादर करणेस सुरुवात दिनांक | : | **दि. ०६/११/२०२४ सायं. ५.३० वाजेपासून** |
| ८) ई—निविदा स्विकारणेचा अंतिम दिनांक | : | **दि. २६/११/२०२४ सायं ५.३० पर्यंत** |
| ९) ई—निविदा उघडण्याचा दिनांक | : | अ) तांत्रिक निविदा—लिफाफा क्र १<br>जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे येथे **दि. २८/११/२०२४ रोजी दुपारी ०२.००** वाजता उघडण्यात येतील.<br><br>ब) व्यापारी/आर्थिक निविदा—लिफाफा क्र २<br>तांत्रिक निविदेतील कागदपत्रांची पडताळणी झाल्यानंतर आर्थिक निविदा उघडणेबाबत निविदाधारकांना कळविण्यात येईल. |

.........................................

# **विभाग :– 02**

जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे व त्यांचे अधिपत्याखालील ठाणे जिल्हयातील सर्व न्यायीक तालुका न्यायालये व कार्यालयांच्या सर्व इमारतीच्या अंतर्गत व बाहय परिसराची साफसफाई व स्वच्छतागृहांची साफसफाईच्या कामासाठी दोन वर्षाकरिता कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, ठाणे यांनी त्यांचे पत्रकानुसार कळविलेले न्यायालयीन इमारतींचे व आवाराचे क्षेत्रफळ खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | आस्थापनेचे नांव | न्यायालयातील आतील प्रभाग व आवाराचे क्षेत्रफळ चौ.मी. | न्यायालय इमारतीचे आवार क्षेत्रफळ चौ.मी. | अधिकारी यांचे प्रसाधन गृहे | सार्वजनिक प्रसाधन गृहे |
|---|---|---|---|---|---|
| १ | जिल्हा न्यायालय, ठाणे | १०६५५.०० चौ.मी. | ५५४३.०० चौ.मी. | ४० | ३० |
| २ | दिवाणी न्यायालय, व. स्तर, ठाणे | | | | |
| ३ | मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालय, ठाणे | | | | |
| ४ | न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, पहिले न्यायालय, ठाणे | | | | |
| ५ | न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, दुसरे न्यायालय, ठाणे | | | | |
| ६ | सदस्य सचिव, जिल्हा विधी सेवा प्रधिकरण, ठाणे | | | | |
| ७ | दिवाणी न्यायालय, क. स्तर, बेलापूर | ८४००.०० चौ.मी. | १७१३०.२० चौ.मी. | २१ | ८७ |
| ८ | दिवाणी न्यायालय, क. स्तर, भिवंडी | ७४२४.८६ चौ.मी. | १४३८१.२१ चौ.मी. | ५६ | ३२ |
| ९ | सह दिवाणी न्यायालय क. स्तर, भिवंडी | | | | |
| १० | अपर जिल्हा व सत्र न्यायालय, कल्याण | ८१२.१८ चौ.मी. | २५१०.०० चौ.मी. | २१ | ०६ |
| ११ | दिवाणी न्यायालय व. स्तर, कल्याण | | | | |
| १२ | सह दिवाणी न्यायालय क. स्तर, कल्याण | | | | |
| १३ | न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, पहिले न्यायालय, कल्याण | | | | |
| १४ | न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, तिसरे न्यायालय, कल्याण | | | | |

| अ. क्र. | आस्थापनेचे नांव | न्यायालयातील आतील प्रभाग व आवाराचे क्षेत्रफळ चौ.मी. | न्यायालय इमारतीचे आवार क्षेत्रफळ चौ.मी. | अधिकारी यांचे प्रसाधन गृहे | सार्वजनिक प्रसाधन गृहे |
|---|---|---|---|---|---|
| १५ | दिवाणी न्यायालय, क. स्तर, शहापूर | २११३.०० चौ.मी. | ४२२६.०० चौ.मी. | १४ | १४ |
| १६ | दिवाणी न्यायालय, क.स्तर, उल्हासनगर | ९५०.३१ चौ.मी. | २४३५.८४ चौ.मी. | ०९ | २७ |
| १७ | सह दिवाणी न्यायालय, क. स्तर, उल्हासनगर | | | | |
| १८ | दिवाणी न्यायालय, क. स्तर, मुरबाड | ४८१.७२ चौ.मी. | ५३६८.२८ चौ.मी. | ०४ | १३ |
| १९ | दिवाणी न्यायालय, क. स्तर, डहाणु | २९६६.२३ चौ.मी. | ५३३८.६३ चौ.मी. | ०३ | १० |
| २० | सह दिवाणी न्यायालय, क.स्तर, डहाणु | | | | |
| २१ | अपर जिल्हा व सत्र न्यायालय, पालघर | ३६६३.१४ चौ.मी. | ५७००.०० चौ.मी. | १२ | १२ |
| २२ | दिवाणी न्यायालय व. स्तर, पालघर | | | | |
| २३ | सह दिवाणी न्यायालय, क. स्तर, पालघर | | | | |
| २४ | अपर जिल्हा व सत्र न्यायालय, वसई | १६७३.६७ चौ.मी. | १७२१.७९ चौ.मी. | १३ | १९ |
| २५ | दिवाणी न्यायालय, व.स्तर, वसई | | | | |
| २६ | सह दिवाणी न्यायालय क. स्तर, वसई | | | | |
| २७ | दिवाणी न्यायालय, क. स्तर, जव्हार | ४९८.०० चौ.मी. | ३३३.३९ चौ.मी. | ०४ | ०४ |
| २८ | दिवाणी न्यायालय, क. स्तर, वाडा | १९५०.०० चौ.मी. | ५५००.०० चौ.मी. | ०४ | १६ |
| २९ | नियोजीत नवीन इमारत जिल्हा न्यायालय, ठाणे | १४५४३.०५ चौ.मी. | १११७५.९८ चौ.मी. | २४ | १७४ |
| ३० | नियोजीत नवीन इमारत दिवाणी न्यायालय, क. स्तर, मिरा–भाईंदर (ठाणे) | १५३०.०० चौ.मी. | ३१९७.०० चौ.मी. | ०६ | ३४ |
| ३१ | नियोजीत नवीन इमारत दिवाणी न्यायालय, क. स्तर, अंबरनाथ–चिखलोली (ठाणे) | १२०८.०० चौ.मी. | ६१९५.०० चौ.मी. | ०६ | २६ |
| | एकुण क्षेत्रफळ | ५८८६९.१६ चौ.मी. | ९०७५६.३२ चौ.मी. | २३७ | ५०४ |

# विभाग 03 :— अटी व शती

१) ई—निविदा तांत्रिक लिफाफा (Technical Bid) व आर्थिक लिफाफा (Financial Bid) या दोन लिफाफा पध्दतीने मागविण्यात येत आहे. सदर कंत्राटाचा कालावधी दोन वर्षांचा राहील.

२) निविदाधारकांना निविदा अर्ज, निविदेतील अटी व शर्ती, कामाचे स्वरुप यांची संक्षिप्त माहिती http://mahatenders.gov.in तसेच https://districts.ecourts.gov.in/thane संकेतस्थळावरुन डाउनलोड करता येतील.

३) **निविदा फॉर्म शुल्क**:— निविदा फॉर्मची किंमत रक्कम रुपये १५,०००/— (अक्षरी पंधरा हजार रु.) ना—परतावा राहील. निविदा फॉर्म शुल्क **ऑनलाईन** पध्दतीने स्विकारण्यात येईल.

४) **बयाणा रक्कम**:— निविदा धारकाने बयाना रक्कम (EMD) रुपये १०,००,०००/— (अक्षरी दहा लाख रु.) ऑनलाईन पध्दतीने भरणे निविदाधारकांवर बंधनकारक आहे. तसेच ज्या निविदाधारकांना बयाणा रक्कम भरणेपासून सुट असेल अशा विदाधारकांनी त्यांचे सुट प्रमाणपत्र (Exemption Certificate) अपलोड करणे आवश्यक आहे.

५) ज्या कंत्राटदाराची निविदा स्विकृत करण्यात येईल, त्यांना सदर कामाचे आदेश मिळालेपासून १० दिवसांचे आत सेवा करार करणे बंधनकारक असेल.

६) **सुरक्षा ठेव :—** ज्या निविदेधारकांची निविदा मान्य करण्यात आली आहे, त्या निविदाधारकास निविदा रकमेच्या ०३ (तीन) टक्के रक्कमेची राष्ट्रीयकृत बॅकेची दोन वर्षाच्या कालावधीकरिता बॅक गॅरंटी या कार्यालयाकडे जमा करावी लागेल. तसेच कंत्राटदाराने कराराच्या कोणत्याही अटी व शर्तीचा भंग केल्यास, बॅक गॅरटीची रक्कम जप्त करण्याचा अधिकार या कार्यालयास राहील.

७) **निविदाकारांना/कंत्राटदारांना जिल्हयातील न्यायालयांत करावयाच्या साफसफाईच्या कामांची व्याप्ती व माहिती जाणून घेणे कामी न्यायालयांना समक्ष भेट द्यावयाची असल्यास अधिक्षक, रोख व वित्त विभाग, ठाणे यांच्याशी ०२२—२५४७९७२८ या क्रमांकावर संपर्क करुन वेळ ठरवून कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत सकाळी ११.०० ते सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत भेट देवू शकतात.**

८) **ज्या कंत्राटदाराची निविदा स्विकृत करण्यात येईल, त्यांचे सोबत जिल्हा न्यायालय, ठाणे, दिवाणी न्यायालय, क. स्तर, मिरा—भाईंदर (ठाणे) व दिवाणी न्यायालय, क. स्तर, अंबरनाथ—चिखलोली (ठाणे) येथील नियोजीत नवीन इमारतीचे उद्‌घाटन झाल्यानंतर सदर न्यायालये व कार्यालये सुरू झाल्याच्या दिनांकपासून पुढे सेवाहमीचा करार करण्यात येईल व नवीन इमारतीच्या अंतर्गत व बाहय परिसराची साफसफाई व स्वच्छतागृहांची साफसफाई कामाचा मोबदला पुरवठादारास देण्यात येईल.**

९) **निविदा लिफाफ्यासोबत सादर करावयाची कागदपत्रे तांत्रिक लिफाफा (Technical Bid) लिफाफा क्रमांक १** :— निविदाधारकांनी ई—निविदेतील तांत्रिक लिफाफामध्ये खालील सर्व कागदपत्रे अपलोड करणे आवश्यक आहे.

| **अ.क्र.** | **आवश्यक असलेली कागदपत्रे** | |
|---|---|---|
| १ | निविदाधारकाने बयाना रक्कम ऑनलाईन अदा केलेल्या पावतीची प्रत. | |
| २ | **निविदाधारकांना बयाणा रक्कम भरणेपासून सुट असेल अशा निविदाधारकांनी त्यांचे सुट प्रमाणपत्र (Exemption Certificate) अपलोड करणे आवश्यक आहे.** | |
| ३ | कंपनी/संस्थेची नोंदणी प्रमाणपत्र | |
| ४ | कंपनी/संस्थेचे जी.एस.टी कर नोंदणी प्रमाणपत्र | |
| ५ | कंपनी/संस्थेचे जी.एस.टी. क्लिअरन्स प्रमाणपत्र | |
| ६ | कंपनी/संस्थेचे मागील ०३ वर्षांचे आयकर प्रमाणपत्राची प्रत (निविदा धारकाची सन २०२१—२२, २०२२—२३, २०२३—२४ या प्रत्येक वर्षाची उलाढाल रक्कम रू. २,००,००,०००/— अक्षरी रूपये दोन कोटी मात्र किंवा त्यापेक्षा जास्त असले बाबतचे C.A. यांचे कडून प्रमाणित केलेले प्रमाणपत्र) जोडणे आवश्यक. | |
| ७ | कंपनी/संस्थेची ई.एस.आय.सी. व पी.एफ. नोंदणी प्रमाणपत्र | |
| ८ | कंपनी/संस्थेचे पॅन कार्ड | |
| ९ | कंपनी/संस्थेची प्रोफेशनल टॅक्स प्रमाणपत्र | |
| १० | कंपनी/संस्थेची कमीत कमी ५० कर्मचारी संख्या असल्याबाबत लेबर नोंदणी प्रमाणपत्र | |

| अ.क्र. | आवश्यक असलेली कागदपत्रे | |
|---|---|---|
| ११ | गुणवत्ता सेवा प्रमाणपत्र ISO 9001 2008 जोडणे आवश्यक. | |
| १२ | कंपनी/संस्थेस काळया यादीत न टाकल्याबाबत/बंदी न घातल्याबाबत निविदाकाराचे प्रतिज्ञापत्र (नोटरी केलेले) दाखल करावे. | |
| १३ | ई—निविदाकाराने स्वत:वर कोणताही गुन्हा दाखल नसल्याबाबतचे तसेच त्याच्या संदर्भात कोणतेही प्रकरण न्यायालयात प्रलंबित नसल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र (नोटरी केलेले) दाखल करावे. | |
| १४ | ई—निविदाकाराने सदर कामाचा मागील तीन वर्षाचा शासकीय स्वच्छता सेवा पुरविण्याचे अनुभव प्रमाणपत्र व कार्यादेश जोडणे आवश्यक आहे. तसेच सध्यस्थितीत शासकीय संस्थेत स्वच्छता सेवा चालु असणे आवश्यक असून कार्यादेशाची प्रत जोडावी. | |
| १५ | शासकिय संस्थेत स्वच्छता सेवेचे कमीतकमी रूपये एक कोटी व त्यापेक्षा जास्तीचे काम केल्याबाबतचे अनुभव प्रमाणपत्र जोडणी केलेल्या कंपनी/संस्था निविदा भरण्यास पात्र राहतील. | |

**१०) निविदाधारकांनी जाहिरातीमध्ये मागणी केलेली उपरोक्त कागदपत्रांव्यतिरिक्त अनावश्यक व तेच तेच कागदपत्रे अपलोड करू नयेत.**

**११) तांत्रिक लिफाफा उघडणेकरिता निविदाधारकांनी स्वत: अथवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधीसोबत (योग्य त्या अधिकारपत्रासह) तांत्रिक लिफाफ्यामध्ये अपलोड केलेल्या कागदपत्रांच्या मुळ व त्यांची छायांकित प्रत पडताळणी करिता सादर करणे बंधनकारक आहे. निविदाधारकांनी मुळ कागदपत्रे तपासणीसाठी सादर न केल्यास अथवा कागदपत्रे अपूर्ण सादर केल्यास किंवा अपलोड केलेल्या प्रती अणि मुळ प्रतींमध्ये फरक/तफावत आढळल्यास त्यांची निविदा, अस्विकृत/रद्द करण्यात येईल.**

**१२) तांत्रिक लिफाफा उघडणेकरिता व मुळ कागदपत्रांची पडताळणी करणेकरिता दिनांक २८/११/२०२४ रोजी दुपारी ०२.०० वाजता जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे येथे निविदाधारकांनी अथवा त्यांचे प्रतिनिधींनी योग्य त्या अधिकारपत्रासहीत हजर असणे आवश्यक आहे. निविदाधारक हजर न राहिल्यास त्यांची निविदा अस्विकृत/रद्द (निविदा स्पर्धेतून बाद) समजण्यात येईल.**

१३) तांत्रिक लिफाफ्यामध्ये सादर केलेल्या कागदपत्रांची तपासणी केल्यानंतर पात्र व अपात्र निर्णय घेण्याचा संपूर्ण अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, ठाणे यांचे अधिपत्याखालील समितीस राहील. पात्र ठरविणेत आलेल्या निविदाधारकांचे व्यापारी/आर्थिक लिफाफा उघडण्यात येतील.

१४) तांत्रिक लिफाफ्यात पात्र झालेल्या निविदाधारकांना व्यापारी/आर्थिक लिफाफा उघडणेचा दिनांक व वेळ नंतर कळविण्यात येईल याची निविदाधारकांनी नोंद घ्यावी

**१५) आर्थिक लिफाफा (Financial Bid) लिफाफा क्रमांक २:— व्यापारी/आर्थिक निविदाधारकांनी सदर लिफाफा https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ई—निविदेतील BOQ मध्ये विहित केलेल्या नमुन्यातच सादर करणे आवश्यक आहे.**

**१६) व्यापारी / आर्थिक लिफाफा (BOQ) हा ऑनलाईन पध्दतीनेच सादर करावा. तसेच निविदाधारकांनी प्रपत्र—१ (BOQ) नुसार व्यापारी/आर्थिक निविदा सादर न केल्यास अथवा त्यात फरक/तफावत आढळल्यास सदर प्रपत्र—१ (BOQ) आणि निविदा, अस्विकृत / रद्द करण्यात येईल.**

**१७) विहित नमुन्यात सादर करण्यात येणा—या BOQ वर अधिकृत व्यक्तीचा सही व सदर संस्थेचा शिक्का असावा. व्यापारी/आर्थिक लिफाफा उघडतेवेळी पात्र निविदाधारकांनी स्वत: किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी यांनी निविदाधारकाने प्रदान केलेल्या योग्य त्या अधिकार पत्रासह उपस्थित रहावे.**

१८) तांत्रिक कारणामुळे ई—निविदा प्रक्रियेतील वेळापत्रकात बदल केला जाऊ शकतो. त्याबाबत सुचना कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर तसेच संकेतस्थळावर वेळोवेळी प्रदर्शित केल्या जातील.

१९) सदर कामाचे कोणत्याही स्तरावर एक अथवा सर्व ई—निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे सर्व अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, ठाणे यांचे अध्यक्षतेखालील समितीने राखून ठेवले आहेत.

२०) कंत्राटदार हे जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे व त्यांचे अधिपत्याखालील सर्व न्यायीक तालुका न्यायालये व कार्यालयांतील सर्व इमारतीच्या अंतर्गत व बाहय परिसराची साफसफाई व स्वच्छतागृहांची साफसफाई करण्यासाठी करावयाची कामे खालील नमूद केल्याप्रमाणे करून घेतील.

अ. इमारतीच्या बाहेरील मोकळा परिसर तसेच ध्वजस्तंभाचा ओटा झाडून, पुसुन स्वच्छ करणे.

ब. सर्व इमारतीचे सर्व मजल्यावरील प्रवेशद्वाराजवळील भाग (द्वार, मंडप) झाडून पुसुन स्वच्छ करणे.

क. सर्व न्यायालयीन इमारती, प्रसाधनगृहे, वॉश बेसिन, व्हरांडा, जिना लोखंडी जाळी, खिडक्यांच्या काचा/तावदाने (आतून—बाहेरून), खिडक्यांची चौकट, दरवाजे, व्हरांडयामधील विद्युत दिवे, पंखे, कॉरिडोरमधील फरशी तसेच जिन्याची रेलिंग स्वच्छ करणे.

ड. बागेमधील व इमारतीच्या सभोवतालचा मोकळा परिसर स्वच्छ करणे.

| अ.क्र. | कामाबाबतचा तपशील | कामाची वारंवारीता | करावयाची कामे |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| ०१. | इमारतीच्या फरशीच्या स्वच्छतेबाबत (व्हरांडा/कॉरीडोर व जिन्यामधील फरशी) | दररोज दिवसातुन दोन वेळा | झाडणे, ब्लीचिंग पावडरचा वापर करून घासुन स्वच्छ करणे ओल्या व कोरडया कपडयाने पुसुन घेणे |
| ०२. | वॉश बेसिन, सर्व प्रसाधनगृहे | दररोज दिवसातुन तीन/चार वेळा | ॲसिड, ब्लीचिंग पावडर व फिनाईलचा वापर करून धुणे व स्वच्छता करणे. |
| ०३. | इमारतीच्या बाहेरील परिसर व रस्ते | दररोज दिवसातुन दोन वेळा | झाडून स्वच्छ करणे. |
| ०४. | सर्व इमारतीच्या तसेच व्हरांडयामधील लोखंडी जाळया, खिडक्यांच्या काचा/तावदाने, खिडक्यांची चौकट, विद्युत दिवे, पंखे, दरवाजे व जिन्याची रेलिंग | आठवडयातुन एकदा (एका ठराविक दिवशी) | ओल्या कपडयाने स्वच्छ करून कोरडया कपडयाने पुसुन घेणे व ग्लास क्लीन कीटची वापर करून स्वच्छ ठेवणे. |
| ०५. | इमारतीचे स्तंभ व लगतच्या भिंतीच्या स्वच्छतेबाबत | आठवडयातुन एकदा (एका ठराविक दिवशी) | झाडुन, धुळ, जाळे काढुन ओल्या फडक्याने ब्लीचींग पावडरचा वापर करून, पाणी व ब्रश वगैरे साधनांचा वापर करून स्वच्छ करणे. |

| अ.क्र. | कामाबाबतचा तपशील | कामाची वारंवारीता | करावयाची कामे |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| ०६. | व्हरांडयातील पिण्याचे पाण्याचे वॉटर कुलर व त्या भोवतीची जागा | दररोज दिवसातुन दोन वेळा | वॉटर कुलर आतून व बाहेरून धुवून पुसुन स्वच्छ करणे व त्या भोवतीची जागा ब्लीचिंग पावडर वापरून स्वच्छ करणे. |
| ०७. | कॉन्फरन्स / लायब्ररी कक्षाची सफाई | दररोज | धुळ काढणे व भिंती साफ करणे, ओल्या कपडयाने स्वच्छ करून टेबल व खुर्च्या कपडयाने पुसुन घेणे. |
| ०८. | बागेतील झाडांस, हिरवळीस व परीसरातील शोभेच्या झाडांना पाणी देणे व अतिरीक्त झाडयांच्या फांदया छाटणे | दररोज | बागेतील झाडांस, हिरवळीस पाणी देणे, झाडांची व हिरवळीची वाढ झाल्यानंतर ती कापून घेणे, न्यायालयीन परिसरातील शोभेच्या झाडांना पाणी देणे व त्यांची निगा राखणे. |
| ०९. | पाणी साठवण्याचे सर्व हौद, प्लास्टीकच्या टाक्या यांच्या साफसफाईबाबत | प्रत्येक महिन्यातुन एक वेळा | ब्लीचिंग पावडरचा वापर करून आतून धुवून व पुसुन स्वच्छ करणे |
| १०. | कच—याची विल्हेवाट | दररोज दिवसातून दोनदा | जमा झालेल्या कच—याची योग्य ती विल्हेवाट लावणे |
| ११. | अभिलेख कक्ष व मुद्देमाल कक्ष | आठवडयातुन एकदा (एका ठराविक दिवशी) | धुळ काढणे व भिंती साफ करणे |

२१) कंत्राटदारास तो उपलब्ध करून देत असलेल्या कंत्राटी सेवांसाठी शासन निर्णय क्र पदनि/२५१२ प्र.क्र./१५७ का.१२, दिनांक २७/०२/२०१३, २६/०२/२०१३, ०६/०३/२०१३, १९/०३/२०१३, ०३/०९/२०१४ व २७/०१/२०१५ व या संदर्भात वेळोवेळी निर्गमीत करण्यात आलेल्या सर्व शासन निर्णयातील (सदर शासन निर्णय शासनाच्या www.maharashrta.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.) निर्देशांचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक आहे याची कृपया नोंद घ्यावी.

२२) कंत्राटदारांनी त्यांच्यामार्फत सदरील साफसफाईच्या कामासाठी नियुक्त केलेल्या कामगारांना द्यावयाची वेतनाची रक्कम व अतिकालीक भत्याची रक्कम ही किमान वेतन कायद्यातील तरतुदींपेक्षा कमी नसावी.

२३) खाजगी कंत्राटदार हे त्यांच्या वतीने नेमण्यात येणा—या कंत्राटी कामगारांची नावे, त्यांचा पत्ता, फोटो व त्यांची चारित्र्यविषयक प्रमाणपत्रे या कार्यालयात सादर करतील.

२४) कामगारांच्या कामाच्या वेळा कंत्राटदार हे गरजेनुसार ठरवतील. तसेच सुट्टीच्या दिवशी देखील गरज भासल्यास काम करावे लागेल.

२५) सदर कामाकरीता कंत्राटदार यांना देय मोबदला हा एक महिन्याचा कालावधी संपल्यानंतर देण्यात येईल. काही तांत्रिक अथवा अपरिहार्य कारणास्तव मोबदला देण्यास उशीर झाल्यास सदर रक्कमेवर व्याज देय राहणार नाही. तसेच देण्यात येणा—या मोबदल्यावर कर भरण्याची जबाबदारी सर्वस्वी कंत्राटदार यांची राहील.

२६) न्यायालयीन इमारत व इमारतीचा परिसर, इमारतीतील प्रसाधनगृहे, व्हरांडे, वॉश बेसिन तसेच जिना हा परिसर त्यांना नियमित स्वच्छ ठेवावा लागेल. त्याचप्रमाणे व्हरांडा व जिन्यातील छताला लागलेले जाळे स्वच्छ करावे लागेल.

२७) इमारतींच्या साफसफाई करीता लागणा—या आवश्यक वस्तु/साधनसामुग्री याबाबतचा खर्च हा कंत्राटदार हेच करतील.

२८) न्यायालयीन इमारतीमधील व परिसरातील विद्युत दिवे हे गरजेप्रमाणे चालू व बंद करण्याबाबतची जबाबदारी कंत्राटदारास नेमलेल्या कामगारांवर राहील. तसेच प्रसाधनगृहामध्ये पाण्यांचा वापर ते काटकसरीने करण्याबाबत काळजी घेतील.

२९) कंत्राटदारास त्याने सदरील साफसफाईच्या कामासाठी नेमलेल्या कंत्राटी कामगार यांना किमान वेतन अधिनियम १९४८ मधील तरतुदीनुसार वेतन, महागाई भत्ता, इतर भत्ते व सवलती लागु करणे कंत्राटदारावर बंधनकारक असेल.

३०) साफसफाई कामी कंत्राटदारामार्फत नियुक्त केल्या जाणा—या कामगारांना अदा करावयाची वेतनाची रक्कम, ही किमान वेतन कायद्यातील तरतुदीनुसार कंत्राटदारांडून कंत्राटी कामगाराला देय असलेले किमान वेतन + विशेष भत्ता + बोनस + भविष्य निर्वाह निधी + राज्य कामगार विमा योजनेत जमा करावयाची रक्कम + उपदान इत्यादी मिळून होणारी रक्कम कामगारांना अदा करण्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदारावर राहील.

३१) कंत्राटदाराने न्यायालय इमारतीच्या साफसफाई करणेचे कामाकरिता कामकाजासाठी नेमलेल्या कंत्राटी कामगारांना किमान वेतन कायद्यातील तरतुदींपेक्षा कमी वेतन अदा केल्याचे निदर्शनास आले तर संबंधित कंत्राटदारावर किमान वेतन कायद्यातील तरतुदीप्रमाणे कारवाई करण्यात येईल व त्याचे कंत्राट तात्काळ रद्द करून त्याचे नावं काळया यादीत टाकण्याची कार्यवाही करण्यात येईल. त्या अनुषंगाने कंत्राटदार यांना सुचित करण्यात येते की, त्यांनी नेमणुक केलेल्या कर्मचा—यांच्या वेतनाबाबतच्या किंवा सेवेबाबतच्या कोणत्याही तक्रारी या कार्यालयाकडे येणार नाही याची त्यांनी दखल घ्यावी.

३२) कार्यालय बंद असेल त्या दिवशी कामगारांना कामावर बोलविण्यात आले नसल्यास त्यांचे वेतन कापून घेण्यात येवू नये. तथापी कार्यालय बंद असेल त्या दिवशी कामगारांना काम करण्यासाठी कार्यालयात बोलविण्यात आले तर त्यांना कार्यालयात येणे बंधनकारक राहील व त्यासाठी त्यांना वेगळा मोबदला मिळणार नाही. किमान वेतन कायद्यातील तरतुदींप्रमाणे कंत्राटी कामगाराला दर आठवडयास एक (रविवारी) भरपगारी सुट्टी देणे तसेच दुसरा व चौथा शनिवार सफाई कामगार यांना कार्यालयात उपस्थित राहणे ही बाब कंत्राटदार यांचेवर बंधनकारक राहील.

३३) सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी कामगारांना कामावर बोलविण्यात आले नसल्यास त्यांचे त्या दिवसाचे वेतन कापून घेण्यात येवू नये. तथापी सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी कामगारांना काम करण्यासाठी कार्यालयात बोलविण्यात आले तर त्यांना कार्यालयात येणे बंधनकारक राहील व त्याऐवजी त्या कंत्राटी कामगारास बदली रजा अथवा किमान वेतन अधिनियम व कामगार कायद्यानुसार देय असलेले त्या दिवसाचे वेतन यापैकी कोणताही एक पर्याय निवडता येईल.

३४) कामगाराचे बदली रजेच्या/गैरहजेरीच्या दिवशी दुसरा कामगार उपलब्ध करून देण्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची असेल व उपलब्ध करून देण्यात आलेल्या कामगारांसाठी किमान वेतन कायदा व कामगार कायद्यातील तरतुदीनुसार योग्य ते वेतन संबंधित कार्यालयाकडून अदा करण्यात येईल.

३५) कंत्राटदार यांनी नेमणुक केलेले कामगार हे सर्व एकसारख्या गणवेशात असावेत तसेच त्यांना कंत्राटदारकडून ओळखपत्र देण्यात यावे.

३६) कंत्राटदार यांना देण्यात आलेल्या कंत्राटी सेवेबद्यल ते किंवा त्यांचेवतीने नेमण्यात आलेल्या कंत्राटी कामगार यांना या कार्यालयाकडे कायमस्वरूपी नियुक्तीकरीता हक्क मागण्याचा अधिकार राहणार नाही.

३७) **शासकीय वेळेनंतर कंत्राटी कामगारांना जास्तीचे शासकीय काम करावे लागल्यास त्यांना अतिकालीक भत्ता (ओव्हरटाईम) देणे कंत्राटदारास बंधनकारक असेल व सदर अतिकालीक भत्ता देण्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदारावर असेल. कंत्राटदारांनी त्यांच्यामार्फत सदरील कामासाठी नियुक्त केलेल्या कामगारांना द्यावयाची वेतनाची रक्कम व अतिकालीक भत्याची रक्कम ही किमान वेतन कायद्यातील तरतुदींपेक्षा कमी नसावी.**

३८) कंत्राटदार हे कार्यालयात काम करतांना त्यांचे नजरेस ज्या काही बाबी येतील त्या कार्यालयीन बाबी आहेत. याची जाणीव ठेवून त्या संबंधात आवश्यक ती गोपनियता ठेवतील. तसेच न्यायालयीन कामकाजात कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप होणार नाही याबाबतची दक्षता घेतील. गोपनियतेचा भंग झाल्यास सदरचा करार अंशत: / पुर्णत: रद्द करण्यात येईल.

३९) कंत्राटदार हे त्यांच्या वतीने नेमण्यात आलेल्या कंत्राटी कामगारांकडून दररोज वक्तशीरपणे व नियमिपणे या कार्यालयाचे साफसफाईचे काम करवून घेतील. त्यांची कार्यालयातील वर्तणुक व कामाची गुणवत्ता उच्च दर्जाची राहील व त्यांचे उत्तरदायीत्व हे कार्यालयाच्या सर्व हितसंबंधाचे रक्षण करणेच राहील. तसेच कंत्राटदाराचे वतीने नेमण्यात आलेल्या कंत्राटी कामगारांकडून वक्तशीरपणे व नियमितपणे कार्यालयास उपद्रव होणार नाही याची काळजी घेवून काम करून घेतील तसेच कामगार अयोग्य व अपात्र असल्याचे अथवा त्यांचे अशोभनीय वर्तन असल्याचे आढळल्यास त्या कामगारास काढून टाकणेसंबंधीचे आदेश देण्याचे अधिकार या कार्यालयास राहतील.

४०) कंत्राटदाराने नेमलेल्या कामगारास काम करतांना कोणतीही इजा, अपघात अथवा मनुष्यहानी झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची राहील. त्यास हे कार्यालय कोणत्याही प्रकारे जबाबदार असणार नाही.

४१) कंत्राटासंबंधी कोणताही विवाद निर्माण झाल्यास हे कार्यालय नेमतील ते न्यायाधीश लवाद म्हणून काम पाहतील व १९९६ च्या लवादाच्या कायद्यानुसार या विवादाबाबत त्यांचा निर्णय अंतिम असेल.

४२) कंत्राटदाराने नेमलेल्या कंत्राटी कामगारांकडून सरकारी मालमत्तेचे नुकसान झाले असे या कार्यालयास आढळून आल्यास कंत्राटदारास देण्यात येणा—या मोबदल्यामधुन सदर रक्कम वसुल करण्यात येईल.

४३) कंत्राटदाराने नेमलेले कामगार व कार्यालयामध्ये, मालक व कर्मचारी असे संबंध राहणार नाहीत.

४४) कंत्राटदार हे पेमेंट ऑफ वेजेस ॲक्ट १९३६, एम्लॉई प्राव्हीडंट फंड ॲक्ट, पेमेंट ऑफ ग्रॅच्युईटी ॲक्ट १९७२, वर्क्समन कॉम्पेन्सेशन ॲक्ट, वर्क्स कॉन्ट्रॅक्ट ॲक्ट, सेल्स टॅक्स ॲक्ट, मिनिमम वेजेस ॲक्ट १९४८, इंडस्टीयल डिसप्युट ॲक्ट १९४७, कॉन्ट्रॅक्ट लेबी (Prohibition & Regulation) ॲक्ट १९८६ या व इतर सर्व कामगार कायद्यांच्या तरतुदींचे पालन करण्याची जबाबदारी व त्यानुसार होणा—या परिणामांची जबाबदारी कंत्राटदारावर राहील. सदरचे काम करण्यासाठी कायदयानुसार लागणारे सर्व परवाने घेण्याची जबाबदारी कंत्राटदारची राहील.

४५) कंत्राटदारास अदा करावयाचे देयक प्रत्येक महिन्याच्या पाच तारखेपर्यंत प्रत्येक तालुका आस्थापनेवरील साफसफाईचे काम योग्य रितीने व समाधानकारक केल्याबाबतचे व हजेरीबाबत तेथील न्यायालयीन अधिकारी यांच्या सहीच्या प्रमाणपत्र जिल्हा न्यायालय, ठाणे येथे जमा केल्यावरच देयक अदा करण्यात येईल.

४६) कंत्राटदार यांना एकुण कंत्राटाच्या रक्कमेच्या ०३ टक्के रक्कम मुदत ठेव किंवा बॅक गॅरंटीद्वारे दोन वर्षाकरीता सुरक्षा ठेव म्हणून द्यावी लागेल. तसेच त्यांनी कराराची कोणत्याही अटी व शर्तीचा भंग केल्यास, मुदत ठेव/बॅक गॅरंटीची रक्कम सरकार जमा करण्याचा हक्क या कार्यालयास राहील. सेवा कराराच्या दरम्यान कंत्राटदाराची सेवा असमाधानकारक आढळून आल्यास सदर करार नोटीस देवून रद्द करण्यात येईल आणि सदरचे काम इतर दुस—या एजन्सीकडून कंत्राटदाराच्या जबाबदारीवर व त्याच्या खर्चाने दुसरी व्यवस्था होईपर्यंत करून देणे कंत्राटदारावर बंधनकारक राहील.

४७) जिल्हा न्यायालय, ठाणे व जिल्हा न्यायालय, अंतर्गत असलेल्या तालुका न्यायालयात सर्व प्रकारची कामे कंत्राटी पध्दतीने करून घेतल्याबाबतचा मासिक अहवाल असमाधानकारक आल्यास कंत्राटदारास देण्यात येणा—या मोबदल्यातुन मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश ठरवतील त्याप्रमाणे रक्कम वजा करण्यात येईल.

४८) सर्व ई—निविदा या लायब्ररी हॉल, जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे येथे दिलेल्या तारखेस व वेळी उघडण्यात येतील.

४९) केवळ ई—निविदा किंवा बयाना/अनामत रक्कम जमा केली म्हणुन कंत्राटावर हक्क सांगता येणार नाही.

५०) कंत्राटदार यांनी कंत्राट दरम्यानच्या काळात वरील अटी व शर्तीचे पालन करेल असे हमीपत्र लिहून द्यावे.

# विभाग 04 :– निविदा वेळापत्रक

| अ. क्र | तपशील | दिनांक | वेळ |
| --- | --- | --- | --- |
| १ | ई–निविदा वृत्तपत्रात प्रसिद्धी दिनांक | –– | –– |
| २ | ई–निविदा विक्री व सादर करणेस सुरुवात दिनांक | **०६/११/२०२४** | **सायं. ५.३० पासून** |
| ३ | ई–निविदा सादर करणेचा अंतिम दिनांक | **२६/११/२०२४** | **सायं. ५.३० पर्यंत** |
| ४ | तांत्रिक निविदा उघडण्याचा दिनांक | **२८/११/२०२४** | **दुपारी ०२.०० वाजता** |
| ५ | आर्थिक निविदा उघडण्याचा दिनांक | **तांत्रिक निविदेतील कागदपत्रांची पडताळणी झाल्यानंतर आर्थिक निविदा उघडणेबाबत निविदाधारकांना कळविण्यात येईल.** | |

# परिशिष्ट

जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे व त्यांचे अधिपत्याखालील ठाणे जिल्हयातील सर्व न्यायीक तालुका न्यायालये व कार्यालयांच्या सर्व इमारतील अंतर्गत व बाहय परिसराची साफसफाई व स्वच्छतागृहांची साफसफाईचे कामासाठी दोन वर्षाकरिता कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, ठाणे यांनी त्यांचे पत्रकानुसार निश्चित केलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | न्यायालयातील आतील प्रभाग व आवाराचे क्षेत्रफळ चौ. मी. | न्यायालय इमारतीचे आवार क्षेत्रफळ चौ.मी. | अधिकारी यांचे प्रसाधन गृहे | सार्वजनिक प्रसाधन गृहे | दर | अंदाजे वार्षिक रक्कम रूपये |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे व त्यांचे अधिपत्याखालील ठाणे जिल्हयातील सर्व न्यायीक तालुका न्यायालये व कार्यालयांच्या सर्व इमारतीची साफसफाई करणे, फरशी पुसून स्वच्छ करणे, सर्व व्हरांडे/कॉरीडोर व जिना इ. ची साफसफाई करणे. व्हरांडयातील लोखंडी जाळया, खिडक्यांच्या काचा/तावदाने, इमारतीचे स्तंभ व लगतच्या भिंती इ. ची साफसफाई करणे, इमारती बाहेरील सर्व परिसर व रस्ते झाडुन स्वच्छ करणे. तसेच जिल्हयातील सर्व न्यायालयीन इमारतींमधील व न्यायालयीन परिसरातील सर्व प्रसाधनगृहे व वॉश बेसीन धुणे व स्वच्छता करणे. | **४१५८८.११ चौ.मी.** | **७०१८८.३४ चौ.मी.** | **२०१** | **२७०** | सार्वजनिक बांधकाम विभाग, ठाणे यांनी दिलेल्या विगतवारी—नुसार | **रूपये १२,४४,७३,५९७/—** |
| २. | नियोजीत नवीन इमारत जिल्हा न्यायालय, ठाणे | **१४५४३.०५ चौ.मी.** | **१११७५.९८ चौ.मी.** | **२४** | **१७४** | सार्वजनिक बांधकाम विभाग, ठाणे यांनी दिलेल्या विगतवारी—नुसार | **रूपये २,९५,३७,२६९.२६/—** |
| ३. | नियोजीत नवीन इमारत दिवाणी न्यायालय, क. स्तर, मिरा—भाईंदर (ठाणे) | **१५३०.०० चौ.मी.** | **३१९७.०० चौ.मी.** | **०६** | **३४** | | **रूपये ५८,५२,८७७.९१/—** |
| ४. | नियोजीत नवीन इमारत दिवाणी न्यायालय, क. स्तर, अंबरनाथ—चिखलोली (ठाणे) | **१२०८.०० चौ.मी.** | **६१९५.०० चौ.मी.** | **०६** | **२६** | | **रूपये ८६,०८,४७५.२३/—** |
| | | **५८८६९.१६ चौ.मी.** | **९०७५६.३२ चौ.मी.** | **२३७** | **५०४** | | **रूपये १६,८४,७२,१८९.३७/—** |

| | |
|---|---|
| प्रथम वर्षाची रक्कम | **रूपये** ८,४२,३६,०९४.६८/— |
| पुढील वर्षाची रक्कम | **रूपये** ८,४२,३६,०९४.६८/— |
| एकुण दोन वर्षाची रक्कम | **रूपये १६,८४,७२,१८९.३७/—** |

# विभाग 05 :— निविदा अर्ज

| | | |
|---|---|---|
| निविदा मागविणा—या कार्यालयाचे नांव | : | जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे |
| कामाचे स्वरुप | : | जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे व त्यांचे अधिपत्याखालील ठाणे जिल्हयातील सर्व न्यायीक तालुका न्यायालये व कार्यालयांतील सर्व इमारतीची व परिसराची बाहय यंत्रणेद्वारे (Out Sourcing) साफसफाई करणेकरीता कंत्राटी सेवा उपलब्ध करून देणे. |
| निविदा क्रमांक | : | जिल्हा न्यायालय, ठाणे/ई—निविदा/०३/२०२४ |
| कंत्राटदार संस्थेचे/ कंपनीचे नाव | : | |
| कंत्राटदार संस्थेचा/ कंपनीचा संपूर्ण पत्ता | : | |
| कंत्राटदार संस्थेचा/ कंपनीचा संपर्क दूरध्वनी | : | |
| कंत्राटदार संस्थेचा / कंपनीचा नोंदणी क्र | : | |
| कंत्राटदार संस्थेचा जी.एस.टी. नोंदणी क्र. | : | |

# प्रपत्र :— 01

| अ.क्र. | कामाचे स्वरूप | मागणी करण्यात आलेली कर्मचारी संख्या | सेवा पुरविण्या—साठी कंत्राटदाराने मागणी केलेली रक्कम (वार्षिक खर्च) | साधन—सामुग्री खर्च रूपये (असलयास) (वार्षिक खर्च) | सेवा कर (वार्षिक खर्च) | एकूण रक्कम (रूपये) स्तंभ ४+५+६ | एकूण रक्कम अक्षरी रूपये | अतिकालीन भत्याची रक्कम (प्रति तास किंवा प्रति दिवस) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** | **७** | **८** | **९** |
| १. | जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे व त्यांचे अधिपत्याखालील ठाणे जिल्हयातील सर्व न्यायीक तालुका न्यायालये व कार्यालयांच्या इमारतीची साफसफाई करणे, फरशी पुसून स्वच्छ करणे, सर्व व्हरांडे/कॉरीडोर व जिना इ. ची साफसफाई करणे. व्हरांडयातील लोखंडी जाळया, खिडक्यांच्या काचा/तावदाने, इमारतीचे स्तंभ व लगतच्या भिंती इ. ची साफसफाई करणे, इमारती बाहेरील सर्व परिसर व रस्ते झाडुन स्वच्छ करणे. तसेच इमारतींमधील व परिसरातील सर्व प्रसाधनगृहे व वॉश बेसीन धुणे व स्वच्छता करणे. | **लागु नाही.** | | | | | | |
| २. | नियोजीत नवीन इमारत जिल्हा न्यायालय, ठाणे | **लागु नाही.** | | | | | | |
| ३. | नियोजीत नवीन इमारत दिवाणी न्यायालय, क. स्तर, मिरा—भाईंदर (ठाणे) | **लागु नाही.** | | | | | | |
| ४. | नियोजीत नवीन इमारत दिवाणी न्यायालय, क. स्तर, अंबरनाथ—चिखलोली (ठाणे) | **लागु नाही.** | | | | | | |

निविदेची दोन वर्षासाठी होणारी एकूण रक्कम रू.
(अक्षरी रू. )

..........................................................
(कंत्राटदाराचे नांव, सही, शिक्का दिनांक)

टिप :— कंत्राटदार संस्था/कंपनी यांची कंत्राटी सेवा उपलब्ध करून देतांना, विधी व न्याय विभाग, शासन निर्णय क्र.पदनि/२५१२/प्र.क्र.१५७/का.१२, दि. २७ जानेवारी २०१५ मधील निर्देशांचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक आहे. सदर शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर २०१५०१२७१५१५५३८३१२ या क्रमांकावर उपलब्ध आहे.

अ) कंत्राटदाराने स्तंभ क्र. ०९ मध्ये उल्लेख केलेल्या कामाचे एका कामगारासाठी प्रती तास किंवा प्रति दिवस अतिकालीन (Over Time) काम केल्यास किती अतिकालीन भत्याची (Over Time) रक्कम कामगारांना किती देणार हे नमूद करणे आवश्यक आहे.

ब) कंत्राटदारांनी नमुद केलेली वेतनाची रक्कम व अतिकालीक भत्याची रक्कम किमान वेतन कायद्यातील तरतुदींपेक्षा कमी नसावी.

# हमीपत्र

मी, श्री. ——————————————————, प्रो. प्रा. ————————————————— इंटरप्रायजेस, पत्ता, ———————————————————————————————— संस्थेचा नोंदणी क्रमांक ————————————————————, संस्थेचा दुरध्वनी क्रमांक ————————— याद्वारे असे हमीपत्र लिहून देत आहे की, आपल्या कार्यालयामार्फत जाहीर करण्यात आलेल्या जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे व त्यांचे अधिपत्याखालील तालुका न्यायालये व कार्यालयांतील सर्व इमारतीच्या अंतर्गत व बाहय परिसराची साफसफाई व स्वच्छतागृहांची साफसफाईचे कामाची निविदा भरतांना निविदा अर्जासोबतचे निविदा सुचनेमध्ये नमूद केलेल्या आपल्या कार्यालयातील कामाची माहिति करुन त्यानुसार निविदा भरली आहे. तसेच मी/आम्ही पुरवठादार सर्व अटी व शर्तींचे पालन करण्यास बांधील आहोत.

आपल्या कार्यालयाने सदर सेवेसाठी निर्गमित केलेले निर्देशन आमचेवर/भागीदारावर बंधनकारक राहील.

ठिकाण :

दिनांक : / /२०२४ स्वाक्षरी व शिक्का

———————————————————————————————————————————